## कोअर बँकिंग प्रणालीद्वारे,
## सभासदांच्या सेवेत सुसज्ज...







"सर्वोत्कृष्ट पतसंस्था म्हणुन महाराष्ट्रातुन प्रथम क्रमांकाचा मानाचा पुरस्कार"

# २० वा वार्षिक अहवाल
## सन २०१६-२०१७

विना सहकार नाही उध्दार !
पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नवी मुंबई

स्थापना १९९७

# पारिजात
## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र. : टी.एन.ए. (टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७

**प्रशासकीय कार्यालय**

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.

E-mail : parijatsociety@rediffmail.com / parijatsociety@gmail.com

# विद्यमान संचालक मंडळ



श्री. कृष्णा पां. धुमाळ
अध्यक्ष



श्री. कैलास वि. खोपडे
उपाध्यक्ष



श्री.बाळासाहेब वि.ताकवले
सचिव



श्री. दिपक शं. टेळे
खजिनदार



श्री. श्रीपती शं. गरुड
संचालक



श्री. अमृत दा. पाटील
संचालक



श्री. आनंदा वा. आंबवले
संचालक



श्री. राजेंद्र ना. कोंडे
संचालक



श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक



सौ. मंदाताई ज्ञा. खोपडे
संचालिका



सौ. लता बा. ताकवले
संचालिका



श्री. काशिनाथ वा. पवार
संचालक
नगरसेवक, न.मुं.म.पा.



श्री. शिवाजी गं. सुळ
संचालक



श्री. सचिन य. रणनवरे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री. तानाजी गु. शिंदे
व्यवस्थापक
(बी.ए.,जी.डी.सी.अॅन्ड ए.,एच.डी.सी.एम.)

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि. नं. टी.एन.ए.(टी.एन.ए.)/आर.एस.आर./(सी.आर.) ९५१/९७

प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, फ्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई-४०० ७०६.

## विसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची विसावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. ३०/७/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता आर्य समाज हॉल, प्लॉट नं. ०६,सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई,** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा पां. धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दि. ०७/०८ /२०१६ रोजी झालेल्या एकोणीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे व दि. २४/१२/२०१६ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०१७ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा - तोटा व ताळेबंद पत्रक यांना मंजुरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१६-२०१७ नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या वैधानीक लेखापरिक्षण अहवाल वाचून स्विकृत करणे.
५) सन २०१७-१८ सालाकरिता वैधानीक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६) सन २०१७-१८ या वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्राकाची आणि गत वर्षाच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे आणि मान्यता घेणे.
७) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
८) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा दोषदुरुस्ती अहवाल वाचुन त्याची नोंद घेणे.
९) संस्थेच्या नवीन शाखा विस्तार करणेस मंजुरी देणे.
१०) संस्थेच्या मुंबई व पुणे विभागातील शाखांसाठी स्वमालकीची जागा खरेदी करण्यास मंजुरी देणे.
११) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने इतर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने

ठिकाण : नवी मुंबई.

**श्री. बाळासाहेब वि. ताकवले**

दिनांक : ०७/०७ /२०१७

(सचिव)

### विशेष सूचना

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजीत सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.



# अध्यक्षीय मनोगत...

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**

आपल्या संस्थेच्या २० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने संस्थेचा सन २०१६-२०१७ चा कार्य अहवाल आपल्या हाती सुपुर्द करताना मनापासुन आनंद होत आहे. प्रत्येक वर्ष ''**अपेक्षा**'' घेऊन सुरु होते आणि'' **अनुभव**'' घेऊन संपते... अपेक्षा आणि अनुभवांच्या दोन दशकांच्या वाटचालीत ''**पारिजात पतसंस्था**'' सतत नाविन्याचा व प्रगत तंत्रज्ञानाचा ध्यास घेऊन पुढे जात आहे.

आपल्या संस्थेने प्रगतीचा आलेख उंचावत दि. ३१ मार्च २०१७ अखेर एकूण संमिश्र व्यवसाय ''**रु. १६७ कोटींचा**'' टप्पा पार केली आहे. संस्थेच्या ठेवी रु. ८१ कोटी व कर्ज वाटप रु. ५९ कोटीच्या पुढे असून संस्थेने रु. २५ कोटीपेक्षा जास्त रक्कमेची स्वतंत्र गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचा स्वनिधी रु. ८.२५ कोटी असून त्याच धडाडीने कर्जवसुली ९७.५४% पेक्षा जास्त केलेली आहे. संस्थेला चालु आर्थिक वर्षात आवश्यक असणाऱ्या सर्व तरतुदी केल्यानंतर रु. ९३ लाखापेक्षा जास्त निव्वळ नफा झाला आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांनी संस्थेस ऑडिट वर्ग '**अ**' दिला आहे.

संस्थेच्या मुंबई व पुणे विभागात प्रशासकीय कार्यालयासह १० शाखा कार्यरत आहेत. त्यापैकी प्रशासकीय कार्यालय व वाशी, कोपरखैरणे आणि धनकवडी या चार कार्यालयाच्या जागा स्वमालकीच्या आहेत.

स्पर्धेत टिकायचे असेल तर तंत्रज्ञानाशिवाय पर्याय नाही हे ओळखुन सभासद व खातेदार यांना तत्पर अचुक अत्याधुनिक तंत्रादवारे सेवा देण्याकरीता संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे स्वमालकीचे ''**डाटा सेंटर**'' उभारून ''**कोअर बँकिंग संगणक प्रणाली**'' सेवेचा अवलंब केला आहे. संस्थेच्या सर्व शाखा **कोअर बँकिंगद्वारे** एकमेकांशी जोडल्या गेल्यामुळे सभासदांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतुन आपल्या खात्यावर व्यवहार करणे सोपे झाले आहे.

अहवाल वर्षात आपल्या पारिजात संस्थेस ''**बँको पतसंस्था पुरस्कार २०१६**'' नागरी पतसंस्था विभागात महाराष्ट्रातुन प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारने सन्मानित करण्यात आले आहे. तसेच संस्थेची **१०** वी नवीन ठाणे शाखा सुरु करण्यात आली असुन संस्थेने **धनकवडी पुणे** शाखेस **स्वमालकीची जागा** खरेदी केली आहे. महिला सभासदांसाठी खास **हळदी कुंकू कार्यक्रमाचे** आयोजन करुन महिलांना योग्य सन्मान देऊन संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे. अहवाल सालातील या विशेष उल्लेखनीय घटना आहेत.

सहकारी कायदे व विविध बदलांना सामोरे जातानां केंद्र सरकारचा ८ नोव्हेंबर २०१६ चा नोटबंदीचा निर्णय, १ एप्रिल २०१७ चा रोख व्यवहार मर्यादा निर्णय व १ जुलै २०१७ चा जी.एस.टी. कर कायदा या सारखे अनेक बदल स्विकारताना त्याचा परिणाम निश्चितच देशातील प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक ठिकाणी झालेला दिसतो. अहवाल सालात संस्थेने वरील बदल स्विकारून लहान व्यवसायीक, मध्यमवर्गीय गरजु सभासद व ग्राहकांना मदतीचा हात व आसरा दिला आहे.

सर्व सभासद ठेवीदार, हितचिंतक यांचा कामकाज सहभाग व विश्वास आणि आर्शिवाद यामुळेच संस्था दिमाखात यशस्वी वाटचाल करत आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी सतत झटणारे अभ्यासु संचालक मंडळ,कर्तव्यतत्पर सेवकवर्ग व दैनंदिन ठेव प्रतिनिधी आणि जागरुक सभासद यामुळेच आपली ''**पारिजात संस्था**'' दिमाखात चौफेर सर्वागीन प्रगती करीत पुढे चालली आहे. हिच संस्थेच्या चांगल्या कामाची पोचपावती आहे.

***जय हिंद! जय महाराष्ट्र! जय सहकार!***

आपला सहकारी

**कृष्णा धुमाळ**

(अध्यक्ष)

## २०वा वार्षिक कार्य अहवाल सन २०१६-२०१७

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा २० वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा -तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरुन येईल.

## संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रु.लाखात)

| तपशिल | ३१/३/२०१६ रु. | ३१/३/२०१७ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | २८०.२८ | ३२९.६५ | ४९.३७ | १७.६१ % |
| राखीव व इ.निधी | ५२९.४४ | ६२६.७८ | ९७.३४ | १८.३८ % |
| सभासद ठेवी | ७९५६.८४ | ८११६.३१ | १५९.४७ | २.०० % |
| गुंतवणूक | ३१०५.७४ | २५९७.३८ | -५०८.३६ | -१६.३६ % |
| सभासद कर्जे | ५२९१.३६ | ५९५५.०१ | ६६३.६५ | १२.५४ % |
| खेळते भांडवल | ८९९५.९५ | ९३०९.९९ | ३१४.०४ | ३.४९ % |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निःस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद : ११६४७

गतवर्षी संस्थेचे ९०३६ सभासद होते, अहवाल वर्षात २७३७ नवीन सभासद झाले आणि १२६ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ११६४७ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल : रु. ३२९.६५ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असुन गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. २,८०,२७,६००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. ४९,३६,९००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१७ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ३,२९,६४,५००/- इतके आहे.

## गंगाजळी व इतर निधी : रु. ६२६.७८ लाख

संस्थेची जनमाणसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, गुंतवणुक चढ उतार निधी, लाभांश समीकरण निधी, सभासद कल्याण निधी, धर्मादाय निधी, आकस्मिक निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, रौप्यमहोत्सव निधी, माहिती तंत्रज्ञान निधी, निवडणूक निधी उभारलेले आहेत.

गतवर्षाचे संस्थेचे एकूण निधी रु. ५,२९,४३,९४८/- जमा होते. त्यामध्ये अहवाल साली रु. ९७,३३,८६२/- वाढ होऊन वर्षा अखेरीस एकूण निधी रुपये ६,२६,७७,८१०/- इतका झाला आहे.

## ठेवी : रु. ८११६.३१ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षामध्ये वाढ झालेली असून. संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले. दि. ३१/०३/२०१६ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. ७९,५६,८४,९१७/-एवढया होत्या. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. १,५९,४६,३२४/- ठेवींची वाढ होऊन दि. ३१/०३/२०१७ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. ८१,१६,३१,२४१/- झाल्या आहेत.

संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

रु. लाखात

| ठेवीचा प्रकार | सन २०१३-१४ | सन २०१४-१५ | सन २०१५-१६ | सन २०१६-१७ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ४,३५,४५,१४९ | ५,५६,१०,४८८ | ५,८६,७८,८४१ | ७,४५,९५,१९९ |
| दैनंदिन बचत ठेव | १३,०८,२३,११४ | १२,५४,७८,०५४ | १५,७३,६१,६७७ | १२,४०,५४,९१६ |
| अल्प मुदत ठेव | ५,७६,५६,१५८ | ६,२८,४८,१५० | ६,०५,४२,०४२ | ६,८०,७५,९१४ |
| मुदत ठेव | ४,६२,३८,९८१ | ४,०८,९९,३१७ | ५,०८,८७,२४५ | १३,२६,३५,३१६ |
| दामदुप्पट ठेव | २,५१,९७,२७९ | ३,३९,४७,२१२ | ३,८३,४१,४४३ | ४,२१,५४,६७७ |
| पारिजात बक्षीस ठेव | १,४१,९६७ | १,३६,९६७ | १,३४,९६७ | १,३४,९६७ |
| मासिक व्याज प्राप्ती ठेव | ४,४४,२१,१२५ | ५,६९,८९,६७५ | ८,०७,९०,९०० | १०,५८,६७,३०० |
| आवर्त ठेव | ४०,५१,६९० | ४३,९९,८२४ | ५०,७२,२३२ | ६४,२०,४८४ |
| सभासद ठेव | २८,२७,७०३ | ३०,०१,३३८ | ३५,०७,३६३ | ३६,९१,८३२ |
| शुभकार्य ठेव | ४,४६,५७,३४५ | ४,३३,०२,७५५ | ३,९८,८६,४०९ | ३,९५,७९,०९४ |
| शुभलक्ष्मी ठेव | १,७९,०८,११४ | २,१२,०४,१५८ | २,६४,१२,३१३ | २,६९,७७,४८९ |
| धनवर्षा ठेव | ४,५२,४०,५१० | ७९,७२,३२२ | - | -- |
| पारिजात ठेव | २,२३,०३९ | २९,७३९ | २९,७३९ | २९,७३९ |
| वैभवलक्ष्मी ठेव | ६,४५,०६,०७४ | ८,९४,४७,६५६ | ९,३८,४३,१७६ | ५,१७,६९,२१५ |
| धनसंचय ठेव | २,६८,७६,०४८ | ४,२३,८७,२१७ | ८,३१,९५,८३३ | १०,९२,२७,३८९ |
| धनसमृध्दी ठेव | २,७६,७३,०६६ | ७,८४,७३,३६३ | ८,६७,२३,७४९ | ५४,३५,४४५ |
| शुभसंकल्प ठेव | - | - | ४१,५५,२७९ | १,०६,४०,५२४ |
| स्वप्नपुर्ती ठेव | - | - | ६१,२१,७०९ | १,०३,४१,६६१ |
| एकूण रु. | ५८,१९,८७,३६२ | ६७,६४,२८,२३५ | ७९,५६,८४,९१७ | ८१,१६,३१,२४१ |

## गुंतवणूक : रु. २५९७.३८ लाख

संस्थेने सभासदाना कर्ज वाटप करुनही काही रक्कम शिल्लक राहिली ती रक्कम तशीच शिल्लक न ठेवता विविध बँका मध्ये त्यांची गुंतवणूक करून त्यापासून व्याज मिळवून उत्पन्न वाढीचा प्रयत्न केला आहे. सध्याच्या बँकींग क्षेत्रातील विविध बदलांमुळे गुंतवणूक ही आवश्यक बाब झाली आहे. कायदेशीर बाबींची पुर्तता म्हणूनही गुंतवणूकीस महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणूनच खालील तपशिलाप्रमाणे गुंतवणूक करुन त्यापासून व्याज मिळवून सुरक्षिततेची काळजी संचालकांनी घेतली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधीच्या गुंतवणूकी बाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन संस्थेने केले आहे.

दि. ३१/०३/२०१७ अखेर संस्थेची एकूण गुंतवणूक रु. २५,९७,३७,६३९/- एवढी आहे. (रु.लाखात)

| अ.क्र. | गुंतवणूक तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १. | दि. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. भाग | १,०००.०० |
| २. | महाराष्ट्र राज्य सहकारी पत. फेडरेशन लि. भाग | ३,०००.०० |
| ३. | राखीव निधी (रिझर्व फंड) | १,४२,७९,४१३.०० |
| ४. | संशयित व बुडित कर्ज निधी | ६८,८६,०५८.०० |
| ५. | लाभांश समानिकरण निधी | ६,७६,०७५.०० |
| ६. | सभासद कल्याण निधी | ५,६७,६१५.०० |
| ७. | सेवक कल्याण निधी | ३,०९,०००.०० |
| ८. | धर्मादाय निधी | ७९,९५३.०० |
| ९. | मुदत ठेव गुंतवणूक | २३,६९,३५,५२५.०० |
| | एकूण रु. | २५,९७,३७,६३९.०० |

## कर्जे : रु. ५९५५.०१ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनानुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करुन सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु.५२,९१,३६,४५७/-कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु.४०,०६,२८,६४३/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु.३३,४२,६४,१४४/- कर्ज वसुल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. ५९,५५,००,९५६/- कर्ज येणे बाकी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण १२.५४% एवढे आहे.

## कर्ज थकबाकी : प्रमाण २.४६%

पतसंस्थाच्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्यातर्फे सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थांची थकबाकी ही ५% पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. याबाबत आपल्या संस्थेने योग्य कारणासाठी योग्य तारण घेऊन उत्तम प्रकारे कर्ज वाटप केल्यामुळे तसेच थकबाकी होऊ न देण्यासाठी वेळोवेळी कर्जवसुलीसाठी शाखास्तरावर केलेला पाठपुरावा यामुळे कर्जथकबाकी मर्यादित ठेवण्यात संस्था यशस्वी झालेली आहे. मार्च २०१७ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण २.४६% आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता' (Non Performing Assets) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकाना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थाना सुद्धा एन.पी.ए.निकष लागू केले व अनुत्पादक कर्जाची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि. ३१ मार्च २०१७ अखेर निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ३.२४ % आहे. सदर अनुत्पादीत कर्जाची संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २०१७ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | प्रत्यक्ष तरतूद | NPA साठी आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|
| १. | **उत्पादित जिंदगी** | ५७०२.०१ | १४.३० | -- |
| २. | **अनुत्पादित जिंदगी** | | | |
| | अ) सर्वसाधारण जिंदगी | ७७.४४ | } ६२.१० | ३.८७ |
| | ब) संशयीत जिदंगी | १७५.५६ | | २७.१२ |
| | क) बुडीत जिंदगी | - | | -- |
| | एकूण | ५९५५.०१ | ७६.४० | ३०.९९ |

एन.पी.ए. साठी आवश्यक तरतूद रु.३०.९९ लाख असताना संस्थेने स्वेच्छेने प्रत्यक्ष तरतूद रु.६२.१० लाख इतकी केली आहे. तसेच संस्थेने चालु आर्थिक वर्षात ''उत्पादित जिंदगी''(Performing Asset) वर ऑडीट निकषाप्रमाणे (०.२५% प्रमाणे) तरतुद रु. १४.३० लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे हे आपणांस कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल : रु. ९३०९.९९ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. ८९,९५,९५,३८७/- एवढे होते. अहवाल वर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल ३.४९% प्रमाणे रु. ३,१४,०३,५००/- ने वाढुन रु. ९३,०९,९८,८८७/- इतके झाले आहे.

## संचालक मंडळ सभा :

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण १५ सभा होऊन एकूण ३२० ठराव पारीत करण्यात आले. तसेच कर्ज मंजुरी व वितरण समितीच्या मुंबई व पुणे विभागाच्या एकूण ४५ सभा, झालेल्या आहेत. त्याचबरोबर नियोजन समिती, कर्मचारी विषयक समिती, लेखापरिक्षण समिती, संगणक समिती व कर्ज वसुली समिती यांच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी सभा घेण्यात आल्या. मा. संचालक मंडळ व सर्व समितींच्या मिळून अहवाल वर्षात एकूण १०८ सभा घेण्यात आल्या.

## सभासद, संचालक व कर्मचारी प्रशिक्षण :

तंत्रज्ञानामध्ये सतत प्रगती होत असते, तसेच नियमांत वारंवार बदल होत असतात. संस्थेचे कर्मचारी व संचालक यांचे ज्ञान अद्यावत रहावे या हेतूने तसेच शाखा पातळीवरील कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडणे, स्पर्धात्मक युगाचे आव्हान पेलण्यासाठी, ग्राहकांना चांगली व समाधानकारक सेवा देणे याकरिता संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना विविध माध्यामातून सतत प्रशिक्षण देण्यात येते. विविध संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गास कर्मचाऱ्यांना टप्प्या टप्प्याने पाठवून प्रशिक्षण दिलेले आहे. तसेच संस्थेच्या सभासदाना दिनांक २२/०१/२०१७ रोजी प्रशिक्षण वर्गाचे अयोजन करून सहकार भारती सहकार प्रशिक्षण संस्था या शासन मान्य संस्थेकडून प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षण वर्गास २५७ सभासद उपस्थित होते.

## नफा विभागणी : रु. १३.२५ लाख

अहवालसाली एकूण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतुदी वजा जाता रु.१३,२५,२६९.२६ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. १२१.६६ मिळून नफा रु. १३,२५,३९०.९२ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी.ही नम्र विनंती.

| तपशील | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रु. | २३,३१,३५०.०० |
| लाभांश (९% प्रमाणे) | रु. | २६,७९,७८०.०० |
| लाभांश समानीकरण निधी | रु. | २,००,०००.०० |
| रौप्य महोत्सव निधी | रु. | ४,५०,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | ५०,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | रु. | ५०,०००.०० |
| आकस्मिक निधी | रु. | २७,१४,०००.०० |
| गुंतवणूक चढउतार निधी | रु. | २,००,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | रु. | १,००,०००.०० |
| माहिती तंत्रज्ञान निधी | रु. | ५,००,०००.०० |
| निवडणूक निधी | रु. | ५०,०००.००० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | रु. | २६०.९२ |
| एकूण | रु. | १३,२५,३९०.९२ |

## लेखापरिक्षण :

संस्थेचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण श्री. योगेश पाटील ॲण्ड कं. (चार्टर्ड अकौंटंट) यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल गौरवोद्‌गार काढले व संस्थेस **'अ'** वर्ग प्रदान केला. तसेच संस्थेचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. किरण ए.भोसले ॲण्ड कं. (चार्टर्ड अकौटंट) यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

## संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (२) नुसार संचालक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या ३१ मार्च २०१७ अखेर येणे असलेल्या कर्जाचा तपशिल खालील प्रमाणे

| तपशिल | ३१-०३-१६ अखेर येणे कर्ज | सन २०१६-१७ दिलेले कर्ज | सन २०१६-१७ वसुल कर्ज | ३१-०३-१७ अखेर येणे कर्ज | येणे कर्जापैकी थकबाकी रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| संचालक | ७९.४१ | ७२.८० | २१.९३ | १३०.२८ | निरंक | |
| नातेवाईक | ८६.५८ | १८.०० | ८.७३ | ९५.८५ | निरंक | |
| **एकूण** | **१६५.९९** | **९०.८०** | **३०.६६** | **२२६.१३** | **निरंक** | |

## उल्लेखनीय बाबी :

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे:-

### १) कोअर बँकिंग संगणक प्रणाली :

सभासद व खातेदार यांना तत्पर अचुक अत्याधुनिक तंत्रादवारे सेवा देता यावी. याकरिता संस्थेचे प्रशासकीय कार्यालयात अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असे स्वमालकीचे **''डाटा सेंटर''** उभारून **''कोअर बँकिंग संगणक प्रणाली''** सेवेचा शुभारंभ **मा.श्री. शेखरजी चरेगांवकर** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकार परिषद (राज्यमंत्री दर्जा) यांचे शुभहस्ते करण्यात आला. संस्थेच्या सर्व शाखा **कोअर बँकिंगद्वारे** एकमेकांशी जोडल्या गेल्यामुळे सभासदांना संस्थेच्या कोणत्याही शाखेतुन आपल्या खात्यावर व्यवहार करणे सोपे झोले आहे. चालु वर्षात सभासदांसाठी **मोबाईल बँकिंग सुविधा** आणि **एस. एम. एस. सुविधा** सुरु करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.

### २) नवीन शाखा उद्घाटन :-

अहवाल वर्षात संस्थेची नवीन **ठाणे शाखा** सुरू करण्यात आली असुन शाखेचे उद्घाटन **मा. श्री. राजनजी विचारे साहेब** खासदार ठाणे लोकसभा यांचे हस्ते करण्यात आले.

### ३) बँको पुरस्कार :-

अविज पब्लीकेशन कोल्हापूर व गॅलक्सी इनमा. पुणे यांचे संयुक्त विदयमाने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट कामकाज करणाऱ्या पतसंस्थाना दिला जाणारा **''बँको पतसंस्था पुरस्कार २०१६''** नागरी पतसंस्था विभागात सर्वोत्कृष्ट पतसंस्था म्हणुन महाराष्ट्रातुन **प्रथम क्रमांकाचा पुरस्कार** संस्थेस प्राप्त झाला आहे.

### ४) हळदीकुंकू समारंभ

अहवाल वर्षात संस्थेच्या सर्व शाखांमध्ये दि. २१ जानेवारी २०१७ ते १४ फेब्रुवारी २०१७ या कालावधीत महिला सभासदांकरिता हळदी कुंकू समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आले होते. सदर कार्यक्रमास एकूण ७०० महिला सभासद उपस्थित होत्या. महिला सभासदांसाठी खास हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करुन महिलांना योग्य सन्मान देऊन त्या माध्यमातून संस्थेने सामाजिक बांधीलकी जपली आहे.

### ५) सर्वोत्तम शाखा पुरस्कर :-

संस्थेच्या कर्मचारी वर्गास प्रोत्साहीत करण्यासाठी उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या शाखेस व कर्मचाऱ्यांस सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात **सर्वोत्तम शाखा पुरस्कार नेरुळ शाखेस** प्राप्त झाला आहे.

## ६) सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी पुरस्कार :-

मार्च २०१७ अखेर संस्थेकडे ११३ दैनंदिन ठेव प्रतिनिधी काम करीत आहेत. दैनंदिन ठेव वसुलीत उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या दैनंदिन ठेव प्रतिनिधीस सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी म्हणून सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात मुंबई व पुणे विभागातुन **सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधीचा** मान **दादर** शाखेचे ठेव प्रतिनिधी **सौ. शितल ज्ञानेश्वर महांगडे** यांना प्राप्त झाला आहे.

## आभार :

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्था कार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह. बँक लि., ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., नवी मुंबई को-ऑप. बँक लि., कॉसमॉस को-ऑप. बँक लि., नॅशनल को-ऑप. बँक लि., अभ्युदय को-ऑप. बँक लि., महानगर सह. बँक लि., राजर्षी शाहु सहकारी बँक लि., दि.सातारा सहकारी बँक लि., अपना सह.बँक लि., कुर्ला नागरीक सह.बँक लि., पंजाब नॅशनल बँक लि., सारस्वत को-ऑप.बँक लि., कल्याण जनता सह. बँक लि., शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि.,पंजाब अॅण्ड महाराष्ट्र को-ऑप. बँक लि.,जी. पी. पारसिक जनता सह. बँक लि., भारत बँक लि.,यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक श्री. योगेश पाटील (चार्टर्ड अकौटंट), अंतर्गत लेखापरिक्षक श्री. किरण अे. भोसले अॅन्ड कंपनी (चार्टर्ड अकौटंट) आणिकर लेखापरिक्षक श्री.बी.आर. सावंत संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टम्स् आणि मे ट्रस्ट सिस्टम्स अॅन्ड सॉफ्टवेअर तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार अॅड. श्री. सोपान डुंबरे, अॅड.श्री. राजेंद्र शिंदे, अॅड. श्री. विलास बारवकर, अॅड. श्री. विजय नलावडे, अॅड. श्री. सुनिल कोरपडे यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै.ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करू शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मन:पुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## श्रद्धांजली :

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत शिक्षणतज्ञ,सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी



**कृष्णा पां. धुमाळ**

(अध्यक्ष)

दि. ३१ मार्च २०१७

| सन २०१५-१६ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१६-१७ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल :** | | ५,००,००,०००.०० |
| २,८०,२७,६००.०० | **वसूल भाग भांडवल :** | | ३,२९,६४,५००.०० |
| | **राखीव निधी व इतर निधी :** | | |
| १,३०,२६,०३६.०० | राखीव निधी | १,५७,०६,८०२.०० | |
| २,४४,३५,९५६.०० | इमारत निधी | २,९६,६६,२१६.०० | |
| ६२,१०,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ६२,१०,०००.०० | |
| ५३,९९९.०० | धर्मादाय निधी | ४८,९९९.०० | |
| ६,१२,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | १०,१२,०००.०० | |
| ४,८०,९००.०० | सभासद कल्याण निधी | ६,१०,७१९.०० | |
| २,८७,०००.०० | सेवक कल्याण निधी | ३,८७,०००.०० | |
| ३,६८,२०६.०० | सहकार प्रशिक्षण निधी | ४,०१,२२३.०० | |
| २५,९२,०००.०० | आकस्मिक निधी | २८,९२,०००.०० | |
| ३,१५,०००.०० | गुंतवणूक चढउतार निधी | ८,१५,०००.०० | |
| ५,३२,५००.०० | रौप्यमहोत्सव निधी | ७,३२,५००.०० | |
| १२,६५,०००.०० | उत्पादित कर्जावरील संभाव्य तरतुद | १४,३०,०००.०० | |
| २५,६३,९६३.०० | माहिती तंत्रज्ञान निधी | २५,६३,९६३.०० | |
| २,०१,३८८.०० | निवडणूक निधी | २,०१,३८८.०० | ६,२६,७७,८१०.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| ५,८६,७८,८९१.९७ | बचत ठेव | ७,४५,९५,१९९.८४ | |
| १५,७३,६१,६७७.०० | दैनंदिन बचत ठेव | १२,४०,५४,९१६.०० | |
| ३५,०७,३६३.०० | सभासद ठेव | ३६,९१,८३२.०० | |
| ५०,७२,२३२.०० | आवर्त ठेव | ६४,२०,४८८.०० | |
| ३,९८,८६,४०९.०० | शुभकार्य ठेव | ३,९५,७९,०९४.०० | |
| २,६४,१२,३१३.०० | शुभलक्ष्मी ठेव | २,६९,७७,४८९.०० | |
| ४१,५५,२७९.०० | शुभसंकल्प ठेव | १,०६,४०,५२४.०० | |
| ६,०५,४२,०४२.०० | अल्प मुदत ठेव | ६,८०,७५,९९४.०० | |
| ५,०८,८७,२४५.०० | मुदत ठेव | १३,२६,३५,३१६.०० | |
| ८,०७,९०,९००.०० | मासिक प्राप्ती ठेव | १०,५८,६७,३००.०० | |
| ३,८३,४१,४४३.०० | दामदुप्पट ठेव | ४,२१,५४,६७७.०० | |
| १,३४,९६७.०० | पारिजात बक्षीस ठेव | १,३४,९६७.०० | |
| २९,७३९.०० | पारिजात ठेव | २९,७३९.० | |
| ९,३८,४३,१७६.०० | वैभव लक्ष्मी ठेव | ५,१७,६९,२१५.०० | |
| ८,३१,९५,८३३.०० | धनसंचय ठेव | १०,९२,२७,३८९.०० | |
| ८,६७,२३,७४९.०० | धनसमृध्दी ठेव | ५४,३५,४४५.०० | |
| ६१,२१,७०९.०० | स्वप्नपुर्ती ठेव | १,०३,४१,६६१.०० | ८१,१६,३१,२४१.८४ |
| ८७,६६,५६,४६५.९७ | पुढील पानावर..... | | ९०,७२,७३,५५१.८४ |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २०१५-१६ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २०१६-१७ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| ३८,००,२४७.८५ | रोख शिल्लक | २९,३४,०३६.७५ | |
| ८५,३६,२१३.३० | बँक शिल्लक | १,३३,५६,३३७.४६ | १,६२,९०,३७४.२१ |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | ठाणे जिल्हा मध्य सहकारी बँक -भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महा.राज्य सह.पत.फेडरेशन-भाग | ३,०००.०० | |
| २,१९,०९,५००.०० | ठाणे जि.म.सह.बँक -राखीव व इतर निधी | २,२७,९८,११४.०० | |
| १,५०,००,०००.०० | ठाणे जि. म. सह. बँक - मुदत ठेव | १,५०,००,०००.०० | |
| १,३५,००,०००.०० | नवी मुंबई को-ऑप.बँक - मुदत ठेव | २५,००,०००.०० | |
| २,६३,२५,०००.०० | नॅशनल को-ऑप. बँक - मुदत ठेव | १,१५,००,०००.०० | |
| २,९५,१५,०००.०० | शामराव विठ्ठल को-ऑप. बँक - मुदत ठेव | २,०५,१५,०००.०० | |
| २,३०,१२,१२५.०० | अभ्युदय को-ऑप. बँक - मुदत व आर्वत ठेव | ५०,१२,१२५.०० | |
| १,२५,२०,०००.०० | सारस्वत को-ऑप. बँक - मुदत ठेव | १,५२,२०,०००.०० | |
| ३,४८,००,०००.०० | अपना सह. बँक लि.- मुदत ठेव | ८५,००,०००.०० | |
| २०,००,०००.०० | महानगर को-ऑप. बँक लि.- मुदत ठेव | १,००,००,०००.०० | |
| २,२५,००,०००.०० | पंजाब ॲन्ड महा.को-ऑप.बँक - मुदत ठेव | २,२५,००,०००.०० | |
| ०.०० | ठाणे जनता सहकारी बँक - मुदत ठेव | २,००,००,०००.०० | |
| १,०७,८८,४००.०० | जी.पी. पारसिक सह. बँक लि. - मुदत ठेव | २,५२,८८,४००.०० | |
| ५०,००,०००.०० | डी.एम.के. जावली सह. बँक लि. - मुदत ठेव | १,००,००,०००.०० | |
| २,२०,००,०००.०० | शरद सहकारी बँक लि.- मुदत ठेव | २,७०,००,०००.०० | |
| २,५७,००,०००.०० | दि भारत सहकारी बँक लि.- मुदत ठेव | २,३४,००,०००.०० | |
| ७०,००,०००.०० | श्री वारणा सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ५०,००,०००.०० | |
| ३०,००,०००.०० | श्री विरशैव सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ३०,००,०००.०० | |
| ७५,००,०००.०० | दि. सातारा सहकारी बँक लि.- मुदत ठेव | १,२५,००,०००.०० | |
| ४०,००,०००.०० | कुर्ला नागरिक सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ०.०० | |
| १,४५,००,०००.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक - मुदत ठेव | ०.०० | |
| १,००,००,०००.०० | संत सोपानकाका सह. बँक लि.- मुदत ठेव | ०.०० | २५,९७,३७,६३९.०० |
| | **सभासद कर्जे :** | | |
| २,८६,९४,७२०.०० | वैयक्तिक /जामिनकी कर्ज | २,९३,५४,१३१.०० | |
| ९५,२५,४२२.०० | व्यवसाय तारण कर्ज | १,१९,८६,०२१.०० | |
| ४२,७७,३४७.०० | वाहन तारण कर्ज | ६१,९६,८७४.०० | |
| ३९,४८,३५,२४७.०० | सुरक्षित तारण कर्ज | ४५,३७,९५,९८३.०० | |
| १६,६१,६४८.०० | इतर तारण कर्ज | १५,२०,३७७.०० | |
| ९,०७,६६१.०० | शासकीय रोखे कर्ज | ३,७९,१७०.०० | |
| ८१,०२,६६१.०० | दावा दाखल कर्ज | १,४०,००,१०२.०० | |
| ४६,५५,१७६.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | ४२,५६,३१७.०० | |
| १,७७,७७३.०० | कर्मचारी वाहन तारण कर्ज | ९९,०२७.०० | |
| ४७,२९,००६.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | ६२,६१,६९०.०० | |
| २६,२३,५५९.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | २५,३३,९१८.०० | |
| ५,९६,४७,१०८.०० | ठेव तारण कर्ज | ५,३४,२४,३२८.०० | |
| ५१,९८,३७,३२८.१५ | पुढील पानावर..... | | २७,६०,२८,०१३.२१ |

दि. ३१ मार्च २०१७

| सन २०१५-१६ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१६-१७ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ८७,६६,५६,४६५.९७ | मागील पानावरुन....... | | ९०,७२,७३,५५१.८४ |
| | **इतर देणी** | | |
| २९,४४,९१७.०० | ठेवीवरील देय व्याज | २९,९९,१४३.०० | |
| २६,१६,६४५.०० | लाभांश देणे | ३४,६७,७५३.०० | |
| ५०,०००.०० | सिक्युरिटी डिपॉझीट | ५०,०००.०० | |
| ५२,३५०.०० | अधिभार (सरचार्ज) देणे | १८,७४६.०० | |
| १,०२०.०० | शेअर्स अनामत खाते | १०,८४०.०० | ६५,४६,४८२.०० |
| | **इतर तरतूदी :** | | |
| ९,८००.०० | व्यवसाय कर | १०,६००.०० | |
| १,४४,३८३.०० | आयकर टी.डी. एस. | ४३,२४०.०० | |
| १,१३,७०६.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | १,५५,६५५.०० | |
| ४,००,०००.०० | लेखापरिक्षण फी | ४,९३,५००.०० | |
| ९,२३४.०० | कर्मचारी विमा हप्ता | ९,०९२.०० | |
| १३,३००.०० | टेलिफोन बिल | २४,१००.०० | |
| ४४,०००.०० | विज बिल | ६५,०००.०० | |
| १०,५००.०० | व्यवसायिक फी | १०,५००.०० | |
| ६६,४२२.०० | इतर देणी | ३८,७७१.०० | |
| ४,३५,०००.०० | आयकर तरतूद | ५,४५,०००.०० | |
| ०.०० | रिटेशन मनी | २,०१,५००.०० | १५,९६,९५८.०० |
| ७०,२५,०००.०० | **थकीत व्याज निधी तरतूद :** | | ६२,५६,५०५.०० |
| | **नफा तोटा खाते :** | | |
| १५८.३६ | मागील वर्षाचा शिल्लक नफा | १२१.६६ | |
| ९०,०२,४८६.३० | अधिक : चालू वर्षाचा नफा | ९३,२५,२६९.२६ | ९३,२५,३९०.९२ |
| ८९,९५,९५,३८७.६३ | एकूण | | ९३,०९,९८,८८७.७६ |

**मे. योगेश पाटील ॲन्ड कं.**
चार्टर्ड अकौटंट -वैधानिक लेखापरिक्षक

**मे. किरण अे. भोसले ॲण्ड कं.**
चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत लेखापरिक्षक

**श्री. तानाजी गु. शिंदे**
व्यवस्थापक

## अखेरचे ताळेबंदपत्रक

| सन २०१५-१६ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २०१६-१७ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५१,९८,३७,३२८.१५ | **मागील पानावरुन........** | | २७,६०,२८,०१३.२१ |
| ७८,६९,४६८.०० | सोने तारण कर्ज | ८६,८८,९११.०० | |
| १४,२९,६६१.०० | कॅश क्रेडिट कर्ज | ३०,०४,०२७.०० | ५१,५५,००,९५६.०० |
| | **मालमत्ता :** | | |
| ३१,२७,१४१.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | ४३,५१,००१.०० | |
| १५,८०,३६१.०० | संगणक खाते | २१,४२,६९३.०० | |
| २,१०,५२२.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | २,९५,१८७.०० | |
| ३,३२,४५१.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | ४,४९,२६३.०० | |
| ३,१३,३०६.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | ३,८५,०२१.०० | |
| १,४३,९८,६४४.०० | इमारत खाते | १,६८,४९,८८२.०० | |
| १५,४२०.०० | डेली कलेक्शन मशिन खाते | ३३,२९४.०० | |
| ६,०३८.०० | ग्रंथालय खाते | ६,२०२.०० | |
| ४५,६८७.०० | इनव्हर्टर खाते | ५४,७९९.०० | |
| १,७३३.०० | मोबाईल फोन खाते | ०.०० | |
| ५३,१७८.०० | दुचाकी वाहन खाते | ४५,२०१.०० | |
| १,३७,६५१.०० | सी.सी. टीव्ही खाते | १,०४,७४०.०० | २,४७,१७,२८३.०० |
| | **इतर येणी :** | | |
| ७,२०,०००.०० | कार्यालय अनामत | ७,८५,०००.०० | |
| १२,५५०.०० | दुरध्वनी सुरक्षा ठेव | २०,५३५.०० | |
| ४६,२६०.०० | वीज सुरक्षा ठेव | ५३,२६०.०० | |
| ३,५००.०० | पाणी कनेक्शन सुरक्षा ठेव | ३,५००.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. सुरक्षा ठेव | ५,०००.०० | |
| ४,०६,३६१.५४ | स्टेशनरी स्टॉक | ४,१४,६६२.९८ | |
| ५,९००.०० | मुद्रांक साठा | ४,०००.०० | |
| ६३,७३२.०० | आगाऊ विमा | ७८,९०८.०० | |
| १,१६१.०० | पॅनकार्ड कुपन्स स्टॉक | ५७४.०० | |
| १२,६९,३४३.०० | आयकर खाते (२०१०-११ ते २०१६-१७) | १८,२९,३४३.०० | |
| ५,७१,४५३.०० | कार्यालय नुतनीकरण खर्च | २३,७६,७१६.०० | |
| २७,१५८.०० | आगाऊ खर्च | ५,९६६.०० | |
| १,४०,५६४.९४ | टी.डी.एस. व इतर येणी | १,९२,८७५.५७ | |
| ३,९९८.०० | लॉकर भाडे | २,७८२.०० | |
| ०.०० | शाखा उद्‌घाटन प्राथमिक खर्च | १,०८,२९४.०० | ५८,८१,४१६.५५ |
| | **येणे व्याज :** | | |
| ७०,२१,७५७.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज | ६२,५६,५०५.०० | |
| १,६९,९३,६७४.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | २,००,०६,०४३.०० | २,६२,६२,५४८.०० |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| ३३,९००.०० | दै.ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स | २०,५००.०० | |
| ०.०० | कोअर बँकीग सॉफ्टवेअर उभारणी आगाऊ खर्च | २५,८८,१७१.०० | २६,०८,६७१.०० |
| ८९,९५,९५,३८७.६३ | एकूण | | ९३,०९,९८,८८७.७६ |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

दि. ३१ मार्च २०१७

| सन २०१५-१६ रु. पैसे | खर्च | सन २०१६-१७ रु. पैसे |
|---|---|---|
| ५,६९,३४,४२४.०० | सभासद ठेवीवरील व्याज | ६,६५,००,५८०.०० |
| २,००,००३.०० | अधिकर्ष व्याज खर्च | १,९८,५२८.०० |
| १,०८,०६,५४१.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ते | १,३६,९३,५०८.०० |
| ७,३१,५५९.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था अंशदान | ९,५३,१५८.०० |
| १,१६,४१९.०० | कर्मचारी ग्रुप ग्रॅज्युईटी (एल.आय.सी.) खर्च | १,९९,०८५.०० |
| १,४०,९८,४९५.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन व प्रवास खर्च | १,२०,८९,३७५.०० |
| ९,९०,६८३.०० | कार्यालय भाडे | १२,२१,६६०.०० |
| ६,१२,४४८.४३ | स्टेशनरी व दिनदर्शिका छपाई खर्च | ५,४८,००७.०६ |
| ८७,०१९.०० | वार्षिक अहवाल छपाई खर्च | ९४,९५०.०० |
| २,३२,०८२.०० | किरकोळ खर्च | ३,१०,३०२.०० |
| ६,४८,१३७.०० | विज खर्च | ७,४३,९०८.०० |
| १,८७,४३९.०० | टेलिफोन खर्च | ३,१७,५६४.०० |
| २,७७,२०८.०० | प्रवास खर्च | २,७९,३६१.०० |
| ९८,५२२.०० | विमा खर्च | ९८,३९८.०० |
| ८,२०१.०० | टपाल खर्च | ८,२४९.०० |
| २,००,७१३.०० | कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च | २,१७,९६१.०० |
| ७,५१६.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | ८,०१५.०० |
| ३६,७३८.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च | ३२,९६८.०० |
| ४,११,८६०.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल (A.M.C.) | ४,६९,८४३.०० |
| ६,२२५.०० | कार्यालय साफसफाई (A.M.C.) | ५,६००.०० |
| २४,९७१.०० | वातानुकूलीत यंत्रे (A.M.C.) | २३,२८४.०० |
| ४७,०००.०० | डेली कलेक्शन मशीन (A.M.C.) | ५३,५००.०० |
| ४७,५२८.०० | कार्यालय देखभाल व मालमत्ता कर खर्च | ५७,९११.०० |
| १,०१,५४१.०० | कार्यालय साफसफाई खर्च | १,२७,६२४.०० |
| ४,८१,९०८.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय व अंतर्गत) | ४,५०,०००.०० |
| २,१६,७८४.०० | व्यावसायिक व कायदे विषयक सल्लागार फी | १,५७,३३१.०० |
| २,५००.०० | व्यवसाय कर खर्च संस्था | २,५००.०० |
| १,०००.०० | सभासद व वर्गणी | १,९००.०० |
| २२,३३०.०० | दिपावली भेट खर्च | २८,९७०.०० |
| १,७५,०६८.०० | पुजा खर्च | १,५८,७९१.०० |
| ४४,८९८.५९ | बॅक चार्जेस खर्च | ५६,७७८.३२ |
| ५९,२१४.११ | सर्विस टॅक्स खर्च | ७०,९२६.१५ |
| ८,७९,१६,१७५.१३ | पुढील पानावर... | ९,९१,८०,५३५.५३ |

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २०१५-१६ रु. पैसे | उत्पन्न | सन २०१६-१७ रु. पैसे |
|---|---|---|
| ७,५९,२६,५८०.०० | सभासद कर्जावरील व्याज | ८,२४,२४,५२३.०० |
| २,५२,४४,१२२.५० | गुंतवणुकीवरील व्याज | २,८३,५८,८८५.०० |
| ६,००,१८६.०० | कर्ज प्रोसेसिंग चार्जेस | ७,२५,६२६.०० |
| २,३३,७९७.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | ५,१८,८३८.०० |
| १,४२,९३१.०० | फॉर्म फी, स्टेशनरी चार्जेस इ. | १,११,४५१.०० |
| १५०.०० | लाभांश | १५०.०० |
| १०,३१,१५०.६३ | इतर जमा | ९,६२,४६३.७९ |
| १०,३१,७८,९१७.१३ | पुढील पानावर... | ११,३१,०१,९३६.७९ |

दि. ३१ मार्च २०१७

| सन २०१५-१६ रु. पैसे | खर्च | सन २०१६-१७ रु. पैसे |
|---|---|---|
| ८,७९,१६,१७५.१३ | मागील पानावरुन....... | ९,९१,८०,५३५.५३ |
| २३,१५५.७० | कर व परवाना फी | ३२,२२८.०० |
| १,२९,७८७.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १,३६,८०३.०० |
| १,४२,२००.०० | संचालक सभा भत्ता खर्च | १,७४,६००.०० |
| ४,४४७.०० | सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट चार्जेस खर्च | ५,६४६.०० |
| १,१७,२३५.०० | भेट व तपासणी खर्च | १,२४,४२३.०० |
| १३,६०८.०० | लॉकर भाडे खर्च | १५,९६७.०० |
| ३,०६,५२९.०० | कर्ज वसुली खर्च | १,८४,७७७.०० |
| ४८,९५२.०० | जाहिरात खर्च | ६५,४९१.०० |
| २,०३,४२३.०० | सिक्युरिटी गार्ड खर्च | २,२८,०००.०० |
| ६०,०००.०० | ब्रोकरेज खर्च | ८७,०००.०० |
| ५,०००.०० | कर्मचारी गणवेश खर्च | १,२३,२००.०० |
| ५७,२४५.०० | मालमत्ता विक्रीतील तुट खर्च | ९३,८८१.०० |
| १,९१,४३५.०० | कार्यालय नुतनीकरण निर्लेखन खर्च | ३,५१,१५०.०० |
| ०.०० | नविन शाखा कार्यालय उद्घाटन खर्च | १,४९,५८०.०० |
| १,१५,०००.०० | उत्पादित कर्ज संभाव्य तरतूद | १,६५,०००.०० |
| १,०१,०००.०० | सहकार प्रशिक्षण निधी तरतुद | २,००,०००.०० |
| १,१०,०००.०० | आयकर तरतूद | १,१०,०००.०० |
| २४,२५,०००.०० | थकीत व्याज निधी तरतूद | ०.०० |
| १,५०,०००.०० | गुंतवणूक चढ-उतार निधी तरतूद | १,००,०००.०० |
| ५,००,०००.०० | इमारत निधी तरतुद | ४,३२,०००.०० |
| १५,५६,२३९.०० | घसारा | १८,१६,३८६.०० |
| ९०,०२,४८६.३० | निव्वळ नफा ताळेबंदास वर्ग | ९३,२५,२६९.२६ |
| १०,३१,७८,९१७.१३ | एकूण | ११,३१,०१,९३६.७९ |

**मे. योगेश पाटील ॲन्ड कं.**
चार्टर्ड अकौटंट -वैधानिक लेखापरिक्षक

**मे. किरण अे. भोसले ॲण्ड कं.**
चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत लेखापरिक्षक

**श्री. तानाजी गु. शिंदे**
व्यवस्थापक

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २०१५-१६ रु. पैसे | उत्पन्न | सन २०१६-१७ रु. पैसे |
|---|---|---|
| १०,३१,७८,९१७.१३ | मागील पानावरुन......... | ११,३१,०१,९६३.७९ |
| १०,३१,७८,९१७.१३ | एकूण | ११,३१,०१,९३६.७९ |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

# लेखापरीक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कलम ८१ आणि
महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ (३) अन्वये द्यावयाचा)

प्रति, सभासद

**पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई** यांचे आर्थिक विवरणाचे लेखापरिक्षण केले आहे. त्यामध्ये ताळेबंदपत्रक ३१ मार्च २०१७ पर्यंतचे असून, वर्षाच्या अखेरीपर्यंतचे नफा-तोटा विवरणपत्रक आणि हिशेबांच्या धोरणाचा अर्थपुर्ण सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती दिलेली असून, संस्थेचे लेखापरिक्षण आम्ही १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७ पर्यंतचे केले आहे.

**व्यवस्थापनाची आर्थिक विवरणपत्राची जबाबदारी :**

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम याअन्वये आर्थिक विवरणपत्र तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. या जबाबदारीमध्ये संकल्पना करणे, अमलात आणणे आणि आर्थिक विवरण तयार करण्याबाबत अंतर्गत नियंत्रण संबंधात महत्त्वाच्या चुकीच्या विवरणापत्रामधून मुक्त राहील मग ती फसवणूक किंवा चुकींमुळे असेल.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी :**

२) केलेल्या लेखापरिक्षणावर मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे व ते आम्ही केलेल्या लेखापरिक्षेच्या पायावर आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया प्रमाणाप्रमाणे लेखापरिक्षणाचे आम्ही संचालन केले आहे. अशा प्रमाणभूत नितितत्त्वाच्या पालनाची जरूरी आहे व ती आम्ही पाळली आहे. आणि लेखापरिक्षण योग्य आश्वासनपूर्ती मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक विवरण महत्त्वाच्या चुकीच्या विवरण पत्रापासून मुक्त राहील व ते फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्याचे पालन आम्ही केले आहे.

३) लेखापरिक्षेमध्ये लेखापरिक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करणे ही याची पद्धत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पद्धत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनाच्या वापराची पद्धत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षेमध्ये जमाखर्चाच्या मूल्यांकनाच्या विनियोजनाच्या वापर, आणि जमा खर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्राचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

४) लेखापरिक्षेचा पुरावा जो आम्ही मिळविला आहे तो अभिप्रायाचा पाया म्हणून पुरेसा आणि योग्य आहे, असा विश्वास आहे.

**अभिप्राय :**

५) आमच्या मतानुसार आणि आम्हास मिळालेल्या पूर्ण माहीतीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ आणि इतर लागू होणारे अधिनियम आणि किंवा निबंधकांनी प्रसिद्ध केलेली संस्थेला

जरुरीची असणारी परिपत्रके आणि योग्य व उचित बळकटी आणण्यासाठी उचित दृष्टीकोन जो सर्वसाधारण पणे भारतात मान्य केले आहे.

१) ताळेबंद पत्रकाच्या संबंधात संस्थेच्या बाबतीत ३१ मार्च २०१७

२) नफा आणि तोटा विवरणपत्राच्या बाबतीत / जमा आणि खर्च, त्या वर्षीच्या शेवटच्या दिवशी, आणि

**इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल**

६) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा विवरणपत्र तयार केलेले आहे.

**आम्ही अहवाल देतो की,**

७) अ) आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार आणि स्पष्टीकरणानुसार, जे आमच्या लेखापरिक्षणासाठी जरूर आहे ते मिळालेल्या पुऱ्या माहितीनुसार आम्हास असे आढळून आले आहे की, ते समाधानकारक आहे.

ब) संस्थेचे व्यवहार आमच्या दृष्टीस आल्याप्रमाणे संस्थेच्या अधिकारांत करण्यात आले आहेत.

क) आमच्या लेखापरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून व तिच्या शाखांकडून आलेली विवरणपत्रे योग्य आहेत.

८) लेखांकन मानकाप्रमाणे ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा हिशेब यांचे अनुपालन आमच्या मताप्रमाणे योग्य आहे.

**९) आम्ही आणखी पुढील अहवाल सादर करतो.**

१) या अहवालासंदर्भात ताळेबंदपत्रक आणि नफा आणि तोटा आणि खर्चाचा हिशेब हे हिशेबाची पुस्तके विवरणपत्रे यांचा योग्य मेळ बसत आहे.

२) आम्ही पुस्तकांची तपासणी केल्यानंतर संस्थेने योग्य ती ताळेबंदपत्रके जी अधिनियमानुसार जरुरीची आहेत ती सर्व व्यवस्थित आहेत.

३) आम्ही लेखापरिक्षा केलेल्या शाखांचे ताळेबंदपत्रक शाखा लेखापरिक्षकांनी केले असून, तो आम्हाला जरुरीचा आहे, त्याप्रमाणे दिलेला आहे.

४) लेखापरिक्षा चालू असणाऱ्या वर्षी संस्थेला ''अ'' वर्ग मिळाला आहे

**योगेश पाटील ॲण्ड कं.**
सनदी लेखापाल
सही/-
**योगेश पाटील**
प्रोप्रायटर

**स्थळ : नवी मुंबई**
**दिनांक : ०७/०७/२०१७**

## अंदाज पत्रक सन २०१७-२०१८

(रु.लाखात)

| उत्पन्न तपशिल | अंदाजे उत्पन्न २०१६-२०१७ | प्रत्यक्ष उत्पन्न २०१६-२०१७ | अंदाजे उत्पन्न २०१७-२०१८ |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | ९२०.०० | ८२४.२४ | ९२५.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | २७०.०० | २८३.५९ | २३५.०० |
| इतर उत्पन्न | २५.०० | २३.१९ | २७.०० |
| एकूण रु. | १२१५.०० | ११३१.०२ | ११८७.०० |

| खर्च तपशिल | अंदाजे खर्च २०१६-२०१७ | प्रत्यक्ष खर्च २०१६-२०१७ | अंदाजे खर्च २०१७-२०१८ |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज | ६७५.०० | ६६५.०० | ६८५.०० |
| कर्मचारी पगार, बोनस,भ.निर्वाह निधी व ग्रज्युईटी खर्च | १४९.०० | १४८.४६ | १६८.१० |
| दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन प्रवास खर्च | १६९.०० | १२०.८९ | १२०.०० |
| छपाई व स्टेशनरी, अहवाल व कॅलेंडर छपाई खर्च | ९.२५ | ६.४३ | ८.५० |
| वार्षिक सभा व संचालक भत्ता खर्च | ३.७५ | ३.१२ | ४.०० |
| प्रवास व व्हिजीट खर्च,किरकोळ, दिवाळी भेट, गणवेश, | १०.१० | ८.६५ | ११.०० |
| विमा व पोस्टेज खर्च | २.२५ | १.०६ | १.७५ |
| विज,फोन,पाणी, कार्यालय भाडे, सर्विस टॅक्स, टॅक्स व लायसन्स फी, मालमत्ता कर व मेंटनन्स चार्जेस इ. | २७.०० | २४.५२ | २८.५० |
| देखभाल व दुरुस्ती, उद्घाटन नुतनीकरण, पुजा खर्च, साफसफाई खर्च, सिक्युरिटी गार्ड खर्च | १३.४१ | ८.८३ | १०.०० |
| ऑडीट फी खर्च | ६.०० | ४.५० | ६.०० |
| AMC वर्गणी, व्यवसाय कर कायदेशीर सल्लागार फी व ब्रोकरेज | ९.१४ | ८.०१ | ७.५० |
| ओव्हर ड्राफ्ट कर्ज व्याज, बँक चार्जेस व लॉकर भाडे | ७.२५ | २.७२ | ५.२५ |
| कर्ज वसुली व जाहिरात खर्च | ५.२५ | २.५० | ३.६० |
| घसारा खर्च * | १६.५० | १८.१६ | २०.०० |
| तरतूदी (उत्पादित कर्ज संभाव्य तरतूद, गुंतवणूक चढउतार निधी, आयकर तरतूद, सहकार प्रशिक्षण निधी, इमारत निधी इत्यादी ) * | ५.६० | १०.०७ | ५.०० |
| अन्य खर्च (सॉफ्टवेअर डेव्ह., संगणक दुरुस्ती खर्च, मालमत्ता विक्रीतील तुट खर्च, कार्यालय नुतनीकरण खर्च) * | १.५० | ४.८५ | २.०० |
| नफा | १०५.०० | ९३.२५ | १००.८० |
| एकूण रु. | १,२१५.०० | १,१३१.०२ | १,१८७.०० |

* अंदाजापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मा. संचालक मंडळाने मंजुरी दिली असून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी शिफारस करीत आहोत.

# परिशिष्ट - 'अ'

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | **पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई.** |
| प्रशासकीय कार्यालय | : | पारिजात भवन, प्लॉट न. १८, सेक्टर १०ए, नेरुळ (प.), नवी मुंबई- ४०० ७०६. |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए./(टी.एन.ए.)/आर.एस.आर. (सी.आर.)/ ९५१-सन १९९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | दहा (प्रशासकीय कार्यालय व्यतिरिक्त दहा शाखा) |
| सभासद संख्या | : | ११६४७ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. ३,२९,६४,५००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. ६,२६,७७,८१०.०० |
| ठेवी | : | रु. ८१,१६,३१,२४१.०० |
| कर्जे | : | रु. ५९,५५,००,९५६.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. २५,९७,३७,६३९.०० |
| लेखापरिक्षण वर्ग | : | **''अ''** |
| अहवाल सालातील नफा | : | रु. ९३,२५,३९०.९२ |
| कर्मचारी वर्ग | : | ६१ |
| खेळते भांडवल | : | रु. ९३,०९,९८,८८७.०० |

## संस्थेची गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

| सन | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | १,९७,७२,००० | २,१७,४४,६०० | २,४९,३१,५०० | २,८०,२७,६०० | ३,२९,६४,५०० |
| गुंतवणूक | १५,५६,०८,०८२ | २०,२१,९९,७७३ | २४,०६,७६,३९४ | ३१,०५,७४,०२५ | २५,९७,३७,६३९ |
| ठेवी | ४९,३७,३६४१६ | ५८,१९,८७,३६२ | ६७,६४,२८,२३५ | ७९,५६,८४,९१७ | ८१,१६,३१,२४१ |
| कर्जे | ३६,१६,२८,३१५ | ४०,१७,७६,०३९ | ४७,६४,६६,०९८ | ५२,९१,३६,४५७ | ५९,५५,००,९५६ |
| खेळते भांडवल | ५५,६६,६५,७६५ | ६५,५७,६९,१०३ | ७६,४०,८१,०१६ | ८९,९५,९५,३८७ | ९३,०९,९८,८८७ |

### सभासदांना सूचना :

- सभासदाने आपला पत्ता व मोबाईल क्रमांक बदलला असल्यास शाखा कार्यालयास लेखी सुचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी आपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिनाच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आवर्तक ठेव या खात्यांच्या पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी
- संस्थेच्या जुन्या व नविन सभासदांनी के.वाय. सी. नॉर्मस्‌ची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपले ज्या शाखेत खाते आहे, त्या शाखेत संपर्क साधून आपल्या खात्यासाठी आवश्यक के. वाय. सी. कागदपत्रांची (वास्तव्याचा व ओळख पुरावा व फोटो) पूर्तता करावी.
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

### क्रियाशील सभासद :

सर्व सभासदांना सुचित करण्यास येते की, पोटनियमातील तरतुदीनुसार आपण क्रियाशील सभासद म्हणून पात्र राहण्याकरिता सलग ५ वर्षात एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे व एक वर्षासाठी कमीत कमी रु. १०,०००/- ची ठेव ठेवण किंवा रु. ५,०००/- कर्ज घेणे आवश्यक आहे. तरी आपण सदर बाबींची नोंद घेऊन त्याची त्वरीत पूर्तता करावी.

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्रं. : टी.एन.ए. (टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७


**प्रशासकीय कार्यालय**

पारिजात भवन, प्लॉट नं.१८, सेक्टर १०ए , नेरुळ (प.),नवी मुंबई - ४०० ७०६.

फोन : २७७०५१२७ /२७७२४२०१ / ९०२२४४७९९० ● Email : parijatsociety@gmail.com/rediffmail.com


## विशेष ठेव योजना

### इंद्रधनु ठेव योजना

३०० दिवसांकरीता

व्याजदर १०.००%

### वर्षाऋतू ठेव योजना

१५ महिन्यांकरीता

व्याजदर १०.२५%

### उत्कर्ष ठेव योजना

३६ महिन्यांकरीता

व्याजदर १०.७५%

w.e.f. 01/07/2017

*अटी लागू

### सुरक्षित तारण (EMI) कर्ज योजना

ऑफर मर्यादित कालावधीसाठी आकर्षक व्याजदारामध्ये EMI पध्दतीने कर्ज उपलब्ध

१४%

व्याजदर द.सा.द.शे.

EMI हप्ता प्रति रु. १ लाखास रु. १३३२/-

### त्वरीत सोने तारण कर्ज उपलब्ध

व्याजदर १३.५०% द.सा.द.शे.

प्रती तोळा रु. २०,०००/-



अधिक माहितीसाठी संस्थेच्या नजिकच्या शाखेत संपर्क साधावा.

# आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

**प्रशासकीय कार्यालय :** पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.
दुरध्वनी : ०२२-२७७०५१२७ /२७७२४२०१ / ९०२२४४७९९०

## मुंबई विभाग

| शाखा | पत्ता |
| --- | --- |
| वाशी | ए-३/७, सेक्टर -१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. फोन : २७८०२६५९ / ९०२२०९६९८५ |
| नेरुळ | साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर -८, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६. फोन : ०२२-२७७०६९८५/९०२२०९६९८५ |
| दादर | मगनलाल डी-बिल्डींग, रुम नं.१६, पहिला मजला, कबुतरखान्याजवळ, स्टेशन रोड, दादर(प.), मुंबई-४०००२८. फोन : ०२२-२४३००६६५/९०२२८७१६६५ |
| कोपरखैरणे | के.पी.हेरिटेज को-ऑप.हौ.सो., शॉप नं.१०, प्लॉट नं.४१, सेक्टर -७, पोस्ट ऑफिस समोर, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७०९ फोन ; ०२२-२७५४१९९४/९०२२१५८०६ |
| न्यु पनवेल | ओमश्री निकेतन को-ऑप.हौ.सो., शॉप नं.८, प्लॉट नं.१२ ए, सेक्टर -१, महात्मा शाळेसमोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल-४१०२०६ फोन : ९०२२९७४६५८/२७४८१९९७ |
| ठाणे | ऑफिस नं. २१०, दुसरा मजला,बाल गणेश टॉवर, दादा पाटील वाडी, ठाणे स्टेशन जवळ, ठाणे (प.) ४०० ६०१. फोन : ०२२-२५३९६६४३/४१००६८७३ |

## पुणे विभाग

| शाखा | पत्ता |
| --- | --- |
| धनकवडी | शॉप नं. ३४, अजंठा पॅलेस सहकारी गृहरचना संस्था मर्या. सर्व्हे नं. २०/२१, बालाजी नगर, धनकवडी, पुणे - ४११ ०४३. फोन : ०२०-२४३७६६२/९०२१२०६७४६ |
| हडपसर | शॉप नं.४१,अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापुर रोड, हडपसर, पुणे - ४११ ०२८. फोन : ०२०-२६९९११८०/९०२१८१७६७१ |
| सिंहगड रोड | सुर्या प्लाझा, शॉप नं.१०, पहिला मजला, सर्वे नं.-८, धायरी रोड, वडगाव खुर्द, पुणे-४११०४१. फोन : ०२०-२४३९०६४६/९०२१२३११०२ |
| चंदननगर | बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं. -४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड, चंदननगर, पुणे - ४११ ०१४. फोन : ९०२१२११७२२ |




संस्थेचे उत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी **श्री. प्रविण बबन तांबे** यांचा सत्कार करताना संस्थेचे सचिव **श्री. बाळासाहेब ताकवले साहेब** आणि मा. संचालक मंडळ




विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थीनी **कु. ऋतुजा शिंदे** हिस स्मृती चिन्ह व पारितोषिक देताना संस्थेचे अध्यक्ष **श्री. कृष्णा धुमाळ साहेब** आणि मा. संचालक मंडळ.




सन २०१५-१६ आर्थिक वर्षाचा **सर्वोत्तम शाखा पुरस्कार** स्विकारताना संस्थेच्या **कोपरखैरणे** शाखेचे शाखाधिकारी, कर्मचारी वृंद व दैनंदिन ठेव प्रतिनिधी.



संस्थेची धनकवडी पुणे शाखा स्वःमालकीच्या जागेत नुतन कार्यालयाचे उद्घाटन करताना संस्थेचे अध्यक्ष **श्री. कृष्णा धुमाळ साहेब** आणि मा. संचालक मंडळ.

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई



"बँको पतसंस्था पुरस्कार २०१६" नागरी पतसंस्था विभागात संस्थेस "सर्वोत्कृष्ट पतसंस्था" म्हणून महाराष्ट्रातून "प्रथम क्रमांकाचा पुरस्कार" स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष श्री.धुमाळ साहेब, उपाध्यक्ष श्री. खोपडे साहेब, खजिनदार श्री. टेळे साहेब आणि संचालक श्री. प्रभाळे साहेब.



संस्थेची नविन ठाणे शाखा उद्घाटनप्रसंगी मा.खासदार श्री.राजनजी विचारे साहेब, मा.श्री.संजय वाघुले साहेब (सभापती,स्थायी समिती ठाणे म.न.पा.), श्री. विजय माने साहेब (शहरप्रमुख,शिवसेना नवी मुंबई).



संस्थेचे स्वःमालकीचे "डाटा सेंटर" व "कोअर बँकींग" प्रणाली सेवेचा शुभारंभप्रसंगी उद्घाटन करताना मा.श्री. शेखरजी चरेगांवकर अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य सहकार परिषद(राज्यमंत्री दर्जा).



कोअर बँकींग प्रणाली सेवा उद्घाटन सोहळ्यानिमित्त आयोजीत सभासद प्रशिक्षण मेळावा प्रसंगी मा.शेखरजी चरेगांवकर साहेब यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा धुमाळ साहेब आणि मा. संचालक मंडळ.


प्रेषक :

**पारिजात**

को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १० ए, नेरुळ(प.), नवी मुंबई ४०० ७०६. फोन : २७७०५१२७/९०२२४४७९९०


बुक – पोस्ट

प्रति ,